पाहिजेत
ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, १२ वी पास पाहिजेत
नामांकित कंपनी साठी सबस्टेशन कामासाठी शिक्षण ITI इलेक्ट्रिशीयन/वायरमन, 12 वी पास फ्रेश/अनुभवी मुले त्वरित पाहिजे.
संपर्क - 9923155996

दैनिक सोलापूर
असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक
# कटूसत्य
किंमत ५ रुपये
Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

व्यवसाय
आपण ज्येष्ठ, सेवानिवृत्त, गृहिणी आहात का?
आपला वेळ, शिक्षण यांचा उपयोग करून नामांकित कंपनीत आपल्याला वेळत कामाची सुवर्णसंधी!
निश्चित उत्पन्न ■ कोणतीही गुंतवणूक नाही
संपर्क : 8087459854

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक २६५ वा | सोमवार, दि. ०१ जून २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# पहिल्याच दिवशी फडणवीस सरकार मराठ्यांसमोर झुकलं

## रणरणत्या उन्हात झुंज, मध्यरात्री तोडगा

## मनोज जरांगेंनी अखेर उपोषण सोडलं; मागण्यांना किती यश?

# अन्यथा, पुन्हा रणशिंग फुंकणार; जरांगेंनी उपोषण सोडलं, पण सरकारला दिला नवा इशारा!





**जालना (कटूसत्य वृत्त):** मराठा आरक्षणाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसलेले मनोज जरांगे पाटील यांनी अखेर उपोषण मागे घेतले आहे. राज्य सरकारच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या चर्चेनंतर अनेक प्रमुख मागण्यांवर सकारात्मक निर्णय झाल्याची माहिती स्वतः जरांगे यांनी आंदोलकांसमोर दिली.

रणरणत्या उन्हात एकदिवसीय उपोषण करत जरांगे यांनी सरकारवर दबाव वाढवला होता. दिवसभर चर्चेच्या अनेक फेऱ्या झाल्यानंतर शनिवारी रात्री उशिरा सरकारचे प्रतिनिधी आणि जरांगे यांच्या अभ्यासकांमध्ये सविस्तर चर्चा झाली. त्यानंतर तोडगा निघाल्याचे जाहीर करण्यात आले.

**कुणबी नोंदींबाबत मोठा निर्णय**

जरांगे यांनी सांगितले की, सरकारने ५८ लाख कुणबी नोंदी उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. यापूर्वी ४९ लाख नोंदी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. उर्वरित नोंदींची प्रक्रिया विभागीय आयुक्तांच्या माध्यमातून पूर्ण केली जाणार आहे. हैदराबाद गॅझेटच्या आधारे मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याचाही निर्णय मान्य करण्यात आला आहे. कुणबी नोंदी देण्यास अधिकाऱ्यांनी टाळाटाळ केल्यास त्यांच्यावर निलंबनाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

**स्वतंत्र मंत्रालयाची घोषणा**

मराठा आणि कुणबी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यास सरकारने तत्त्वतः मान्यता दिल्याचा दावा जरांगे यांनी केला. या मंत्रालयात स्वतंत्र कक्ष आणि माहिती अधिकारी नियुक्त करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय सातारा संस्थानच्या गॅझेटियरसंदर्भात तातडीने शासन निर्णय काढण्याची मागणीही सरकारने मान्य केल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**आंदोलकांवरील गुन्हे, नोकऱ्यांचा मुद्दा**

मराठा आंदोलनादरम्यान दाखल करण्यात आलेले गुन्हे मागे घेण्याची प्रक्रिया सुरू करण्याबाबत सरकारने सकारात्मक भूमिका घेतली आहे. आंदोलनात मृत्यू झालेल्या मराठा बांधवांच्या वारसांना महावितरण आणि एमआयडीसीमध्ये नोकरी देण्याची मागणीही चर्चेत स्वीकारण्यात आल्याचे जरांगे यांनी सांगितले.

तसेच जातपडताळणीच्या प्रक्रियेमुळे मराठा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश अडणार नाहीत, यासाठीही आवश्यक निर्देश देण्यात येणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

**सरकारची भूमिका काय?**

राधाकृष्ण विखे पाटील यांनी चचेर्नंतर सांगितले की, जरांगे यांनी मांडलेल्या मागण्यांबाबत सरकारने सकारात्मक निर्णय घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मराठा समाजाच्या प्रश्नांबाबत नेहमीच पुढाकार घेतला असून मान्य करण्यात आलेल्या मुद्द्यांवर पुढील दोन ते तीन दिवसांत आवश्यक आदेश काढले जातील. उपोषण मागे घेतल्याने सध्या आंदोलनाला विराम मिळाला असला, तरी सरकारकडून दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी कितपत होते, यावर पुढील भूमिका ठरणार असल्याचे मराठा आंदोलकांकडून सांगितले जात आहे.

सरकारने मुदतीत मागण्यांवर अपेक्षित कार्यवाही केली नाही, तर पुन्हा संघषार्चे रणशिंग फुंकण्याचा इशारा जरांगे यांनी दिला आहे.

मराठा आरक्षणाच्या प्रलंबित मागण्यांसाठी मनोज जरांगे यांनी शनिवारी अंतरवाली सराटी येथे उन्हात बसून उपोषण सुरू केले होते. सरकारच्या शिष्टाईनंतर त्यांनी मध्यरात्री उपोषण मागे घेतले.

'सरकारच्या शिष्टमंडळाने ५८ लाख कुणबी नोंदींना प्रमाणपत्र व वैधता देण्याचे आणि हैदराबाद गॅझेटनुसार कार्यवाहीचे आश्वासन दिले आहे. आंदोलनात गुन्हा दाखल झालेल्या मराठा आंदोलकांवरील गुन्हे मागे घेण्याबाबतही सकारात्मक चर्चा झाली. प्रमाणपत्र वितरणात अडथळे आणणाऱ्या अधिकाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात येईल, सातारा संस्थानासंदर्भात महिनाभरात शासन निर्णय काढण्यात येईल, शिंदे समितीला एक वषार्ची मुदतवाढ दिली जाईल, तसेच ओबीसी मंत्रालयाच्या धर्तीवर मराठा-कुणबी समाजासाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन करण्यासाठी प्रयत्न केले जातील', असे आश्वासन सरकारने दिले आहे, असे जरांगे म्हणाले. जात पडताळणी प्रमाणपत्राअभावी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश रोखले जाणार नाहीत. तसेच मान्य केलेल्या मागण्यांबाबत तातडीने अधिसूचना काढण्यात येईल, असेही सरकारने स्पष्ट केले आहे. सरकारने आश्वासनांची वेळेत अंमलबजावणी करावी; अन्यथा, पुन्हा लढा उभारण्यास सज्ज असल्याचा इशारा जरांगे यांनी दिला. आमदार प्रसाद लाड यांनी रविवारी रुग्णालयात जरांगे यांच्या प्रकृतीची विचारपूस केली.

**वडेट्टीवार, मुंडे यांच्यावर टीका**

काँग्रेसच्या सत्ता काळात ओबीसी आणि मराठा समाजाचे नुकसान झाल्याचा आरोप जरांगे यांनी केला. विजय वडेट्टीवार यांच्यासारख्या नेत्यांमुळे महाराष्ट्रात काँग्रेस संपुष्टात येत असल्याची टीकाही त्यांनी केली. धनंजय मुंडे यांचे नाव न घेता 'परळीचा नेता' असा उल्लेख केला. माझी आणि त्यांची नार्को टेस्ट करा, मला जेवणातून विष देऊन मारण्याचा कट नेमका कोणाचा होता, हेही स्पष्ट होईल, असे जरांगे म्हणाले.

**जरांगेंच्या प्रमुख मागण्या काय आहेत?**

1. सर्व मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया पूर्ण करावी
2. कुणबी प्रमाणपत्रधारकांना जात वैधता प्रमाणपत्र द्यावे
3. १९९४ च्या धर्तीवर अध्यादेश काढावा
4. मराठा उपसमिती बरखास्त करावी
5. आंदोलकांवरील गुन्हे मागे घ्यावेत
6. आंदोलनातील मृतांच्या वारसांना नोकरी द्यावी
7. सारथी संस्थेच्या योजना पुन्हा सुरू कराव्यात
8. महामंडळांचे प्रलंबित परतावे वितरित करावेत
9. स्वतंत्र मराठा आणि कुणबी मंत्रालय स्थापन करावे

# सोलापूर विधान परिषदेसाठी भाजपकडून राजेंद्र राऊत यांना उमेदवारी

## उमेदवारी जाहीर होताच बार्शीत जल्लोष



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीसाठी भाजपने बाशीर्चे माजी आमदार राजेंद्र राऊत यांना उमेदवारी जाहीर केली आहे. रविवारी रात्री उशिरा भाजपच्या केंद्रीय समितीने विधान परिषदेच्या विविध जागांसाठी उमेदवारांची अधिकृत यादी प्रसिद्ध केली.

सोलापूर विधान परिषद निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान होणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील संख्याबळ लक्षात घेता भाजपकडे स्पष्ट बहुमत असल्याने पक्षाचा उमेदवार कोण असणार, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले होते.

या उमेदवारीसाठी माजी आमदार राजेंद्र राऊत आणि प्रशांत परिचारक यांच्यात चुरशीची स्पर्धा असल्याची चर्चा होती. मात्र अखेर पक्षश्रेष्ठींनी राजेंद्र राऊत यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

राजेंद्र राऊत यांनी बार्शी नगरपालिका तसेच बार्शी कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये केलेल्या कामगिरीमुळे त्यांची पक्षातील पकड मजबूत झाली होती. स्थानिक पातळीवरील संघटनात्मक काम, जनसंपर्क आणि नेतृत्व क्षमता यांचा विचार करून भाजपने त्यांना ही संधी दिल्याचे मानले जात आहे.

उमेदवारी जाहीर झाल्यानंतर सोलापूर जिल्ह्यातील भाजप कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील संख्याबळाच्या आधारावर राऊत यांच्या विजयाची शक्यता बळावली आहे.

विधान परिषदेच्या उमेदवार यादीमध्ये राजेंद्र राऊत यांचे नाव जाहीर होताच बार्शी मध्ये एकच जल्लोष पाहायला मिळाला.

दोन वर्षापूर्वी झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत राजेंद्र राऊत यांचा निसटता पराभव झाला होता. बार्शी शहर आणि तालुक्यासाठी भरपूर निधी आणून देखील राजेंद्र राऊत यांना पराभवाला सामोरे जावे लागले होते. याची सल प्रत्येक कार्यकर्त्याच्या मनामध्ये होती. आज उमेदवारी जाहीर होताच चौका चौकात गल्ली गल्ली त फटाक्यांची आतषबाजी करत कार्यकर्त्यांनी आनंदोत्सव साजरा केला.

पराभवाने खचून न जाता राजेंद्र राऊत यांनी बार्शी नगरपालिका कृषी उत्पन्न बाजार समिती जिल्हा परिषद आणि पंचायत समिती अशा सर्व निवडणुकीत विरोधकांना चारी मुंड्या चित करत विजय संपादित केला. आणि बाशीर्चा खरा धुरंदर मीच आहे हे सिद्ध केले.

त्यांच्या या नेतृत्व गुणाची कदर करून महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडवणीस यांनी त्यांना उमेदवारी देऊन एका सच्चा कार्यकर्त्या ला न्याय दिला.

भाऊ विधान परिषदेमध्ये गेल्यामुळे बार्शीच्या विकासाला गती मिळेल असा विश्वास युवा नेते रणवीर राऊत यांनी व्यक्त केला.

# उजनी कालव्यातून तात्काळ पाणी सोडा; अन्यथा तीव्र जनआंदोलन छेडू - खा. प्रणिती शिंदे



**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर-मंगळवेढा सीमेवरील माण नदीकाठच्या गावांसाठी उजनी कालव्यातून दरवर्षी रोटेशननुसार पाणी सोडले जात असताना यंदा मात्र अधिकाऱ्यांच्या हलगर्जीपणा आणि नियोजनशून्य कारभारामुळे पाणी सोडण्यात आले नसल्याचा गंभीर आरोप खासदार प्रणिती शिंदे यांनी केला. नागरिक, शेतकरी आणि पशुधनाच्या हितासाठी तात्काळ पाणी सोडण्यात यावे, अन्यथा शेतकऱ्यांसह तीव्र जनआंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

माण नदीत सोडण्यात येणाऱ्या पाण्याचा लाभ गुंजेगाव, मारापूर, घरनिकी, मल्लेवाडी, शरदनगर, सिद्धेवाडी, ढवळस, धरणगाव, नेपतगाव, तावशी, गार अकोले, सरकोली, तनाळी, तपकीर शेटफळ, ओझेवाडी, मुडवी आणि शंकरगाव या गावांतील नागरिक, शेतकरी व पशुपालकांना होत असतो. पिण्याच्या पाण्यासह शेती आणि जनावरांसाठी हे पाणी अत्यंत महत्त्वाचे आहे. मात्र यंदा रोटेशन चुकल्यामुळे या संपूर्ण परिसरात पाण्याची गंभीर समस्या निर्माण झाली असून नागरिक व शेतकरी मोठ्या अडचणीत सापडले आहेत.

या प्रश्नाबाबत परिसरातील शेतकऱ्यांनी खासदार प्रणिती शिंदे यांची भेट घेऊन निवेदनाद्वारे आपली व्यथा मांडली. या निवेदनाची तात्काळ दखल घेत खासदार शिंदे यांनी पंढरपूर-मंगळवेढा मार्गावरील सिद्धेवाडी पुलाला भेट दिली. यावेळी त्यांनी उजनी कालवा विभागाच्या अधिकाऱ्यांना घटनास्थळी बोलावून घेत शेतकरी व ग्रामस्थांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि तातडीने माण नदीसाठी पाणी सोडण्याच्या सूचना दिल्या. संबंधित अधिकाऱ्यांनीही लवकरात लवकर पाणी सोडण्याचे आश्वासन दिले.

यावेळी बोलताना खासदार प्रणिती शिंदे म्हणाल्या की, "उजनी कालवा विभागाच्या नियोजनशून्य कारभारामुळे यंदाचे पाण्याचे रोटेशन चुकले असून हा अधिकाऱ्यांचा गंभीर हलगर्जीपणा आहे. अधिकारी उडवाउडवीची उत्तरे देत आहेत. पाण्यासाठी आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांवर गुन्हे दाखल केले जातात, मग पाण्याचे योग्य नियोजन न करणाऱ्या अधिकाऱ्यांवरही गुन्हे दाखल झाले पाहिजे.

एकीकडे खत-बियाण्यांच्या किमती वाढल्या आहेत, पेट्रोल-डिझेल महाग झाले आहे, डिझेलचा तुटवडा निर्माण झाला आहे आणि दुसरीकडे पाण्याअभावी शेतकरी संकटात सापडला आहे. शासन आणि प्रशासनाला शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत कोणतीही संवेदनशीलता उरलेली दिसत नाही. भर उन्हाळ्यात नागरिक, शेतकरी आणि जनावरे पाण्यासाठी त्रस्त आहेत. त्यामुळे तात्काळ माण नदीसाठी पाणी सोडण्यात यावे. अन्यथा शेतकऱ्यांसह रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल. पाणी मिळेपर्यंत हा लढा सुरूच राहील.

दरम्यान, खासदार प्रणिती शिंदे यांनी भीमा कालवा मंडळाचे अधीक्षक अभियंता सुभीरवेद्र खांडेकर यांच्याशी मोबाईलद्वारे संपर्क साधूनही माण नदीसाठी तात्काळ पाणी सोडण्याची मागणी केली.

यावेळी भीमा कालवा मंडळाचे कार्यकारी अभियंता कथले, उजनी कालवा विभागाचे अभियंते पंडित, हळकुडे तसेच परिसरातील शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुढच्या 10 दिवसांत शेतकऱ्यांना कर्जमाफी



**अहिल्यानगर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त चौंडी, अहिल्यानगर येथे आयोजित कार्यक्रमातील कृषिमंत्री दत्तात्रय भरणे बोलत होते. या भाषणात त्यांनी शेतकऱ्यांसाठी एक अत्यंत महत्त्वाची मोठी घोषणा केली आहे.

कार्यक्रमात बोलताना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी जाहीर केले की, राज्य सरकारने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या नावाने शेतकऱ्यांसाठी कर्जमाफी जाहीर केली आहे. येत्या ८ ते १० दिवसांत (किंवा १० दिवसांच्या आत) ही कर्जमाफी पूर्ण केली जाईल, अशी मोठी घोषणा त्यांनी केली.

सर्वात महत्त्वाची यावषीर्ची गोष्ट म्हणजे या राज्याचे मुख्यमंत्री यांनी आपल्या सर्वांना माहिती आहे की, पुण्यश्लोक आहिल्यादेवी यांच्या नावाने यावर्षी शेतकऱ्यांची कर्जमाफी त्यांनी जाहीर केली आहे. येणाऱ्या आठ-दहा दिवसात अहिल्यादेवींच्या नावाने जे कर्ज माफी आहे येणाऱ्या दहा दिवसांमध्ये कर्जमाफी केली जाईल, एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि सुनेत्रा वहिनी यांची परवानगी घेऊन मी आपल्या सगळ्यांना सांगतो असंही पुढे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी म्हटलं आहे.

अहिल्यादेवी होळकर यांनी त्या काळात केलेले जलसंधारणाचे काम आणि त्यांचे विचार आजही मार्गदर्शक आहेत. एका इंग्रज लेखकाचा संदर्भ देत भरणे म्हणाले की, जेव्हा जगातील महान स्त्रियांचा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा अहिल्यादेवींचे नाव प्रथम स्थानी असेल. तर चौंडी गावाचा आणि परिसराचा विकास करण्यासाठी साधारण १२०० ते १३०० कोटी रुपयांचा आराखडा तयार करण्यात आला आहे. पुढील २-३ वर्षांत या भागाचे चित्र पूर्णपणे बदलेल, असे त्यांनी सांगितले. हा आराखडा तयार करताना उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, राम शिंदे आणि अजित पवार यांनी मोठे सहकार्य केल्याचा उल्लेख त्यांनी केला.

# जोडभावी पेठ परिसरात अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कारवाई



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील अनधिकृत बांधकामांविरोधात सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत जोडभावी पेठ परिसरात अनधिकृत बांधकाम निष्कासनाची कारवाई करण्यात आली. यामध्ये मिळकतदार अनिल संगा तसेच मिठ्ठ यांच्या जोडभावी पेठ येथील मिळकतींमध्ये सामासिक अंतर (सेटबॅक) तसेच पार्किंगसाठी राखीव जागेत करण्यात आलेल्या अनधिकृत बांधकामांचे निष्कासन करण्याची कार्यवाही हाती घेण्यात आली. महानगरपालिका बांधकाम नियमांचे उल्लंघन करून उभारण्यात आलेल्या या बांधकामांमुळे नागरिकांच्या सोयीसुविधांवर तसेच वाहतूक व सुरक्षिततेवर परिणाम होत असल्याने ही कारवाई करण्यात आली.

महानगरपालिकेच्या पथकाने आवश्यक यंत्रसामग्रीच्या सहाय्याने संबंधित ठिकाणी अनधिकृत बांधकामे हटविण्याची प्रक्रिया राबविली. शहरातील पार्किंग जागा, सामासिक अंतर व सार्वजनिक वापरासाठी राखीव क्षेत्रांवरील अतिक्रमणे हटवून नियोजनबद्ध विकास साधण्याच्या दृष्टीने महानगरपालिका प्रशासन कटिबद्ध असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

सदर कारवाई कार्यकारी अभियंता नीलकंठ मठपती यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. यावेळी उपअभियंता आनंद जोशी, सहाय्यक अभियंता इरशाद जरतार, कनिष्ठ अभियंते बसवराज बडगा, गणेश काकडे, अनिरुद्ध गदगे, दयानंद अवताडे, प्रमोद गोविंदवार, तौसीफ सय्यद, अतिक्रमण विभागाचे दीपक कुंभार तसेच पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

महानगरपालिकेने नागरिकांना बांधकाम परवानगीनुसारच बांधकामे करण्याचे आवाहन केले असून नियमबाह्य व अनधिकृत बांधकामांवर यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचे प्रशासनाने सांगितले.

# किमान १० जून पर्यंत राज्यातील बहुतांश भागात मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही

## १ जून पासून वादळी पावसाचा अंदाज, मात्र शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये

**मुंबई, (कटूसत्य वृत्त):-** सध्या राज्यातील हवामानात बदल होण्यास सुरुवात झाली आहे, आणि १ जून पासून सुरु होणाऱ्या आठवड्यात हवामानात अजून बदल होईल. प्रामुख्याने विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि खानदेशात दुपार नंतरचे ढग आणि काही प्रमाणात वादळी पावसाचा अंदाज वर्तविण्यात आला आहे. कोकणात देखील काही प्रमाणात पावसाचा अंदाज आहे. याच बरोबर मे महिन्याच्या तुलनेत राज्यातील कमाल तापमानात घट होईल, मात्र विदभार्तील काही भागांमध्ये, प्रामुख्याने पूर्व विदर्भ, कमाल तापमान ४० अंशाच्या वर कायम राहील. आगामी वादळी पावसाचा मान्सूनशी काहीही संबंध नाही, कारण मान्सून अद्याप केरळात पोहोचलेला नाही. सध्याच्या स्थितीनुसार राज्यातील बहुतांश भागांमध्ये किमान १० जून पर्यंत मान्सूनच्या आगमनाची शक्यता नाही.

कृषी आणि आपत्ती व्यवस्थापन विभागांकडून शेतकऱ्यांना आणि लोकांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी:

- शेतकऱ्यांनी वादळी पावसावर अवलंबून राहून आणि मान्सूनचे आगमन होण्यापूर्वी पेरणीची घाई करू नये
- विजेच्या कडकडाटाच्या वेळी नागरिकांनी व शेतकऱ्यांनी स्वतःची तसेच पाळीव जनावरांची सुरक्षितता सुनिश्चित करावी. अशा वेळी झाडाखाली, टिनशेडखाली तसेच विद्युत ट्रान्सफॉर्मर, वीज खांब आणि विद्युत वाहिन्यांच्या जवळ उभे राहणे टाळावे

संपादकीय

# तेल दरवाढीचे आर्थिक चटके

इराण-इस्रायल संघर्षामुळे जागतिक तेलबाजार अस्थिर झाला असून त्याचा थेट परिणाम भारतासारख्या ऊर्जा आयातीवर अवलंबून असलेल्या देशांवर होत आहे. पेट्रोल-डिझेल दरवाढ, महागाई, शेती व उद्योगांवरील वाढता खर्च यामुळे सर्वसामान्य नागरिकांचे आर्थिक गणित बिघडू लागले आहे. या संकटातून बाहेर पडण्यासाठी ऊर्जा स्वावलंबन आणि पर्यायी ऊर्जास्रोतांचा विकास ही काळाची गरज बनली आहे. फेब्रुवारीच्या 28 तारखेला सुरू झालेले इराण विरुद्ध इस्रायल आणि अमेरिका युद्धाने सर्व जगाला तेल संकटाकडे नेले आहे. भूराजकीय तणाव पुरवठा साखळी खंडित करून त्यातून सर्वच देशांना इंधन संकट निर्माण केले. भारतासारख्या ऊर्जा परावलंबी देशाचे आणि नागरिकांचे ऊर्जा संकट उपलब्धता आणि दरवाढ अशा दुहेरी स्वरूपात पुढे आले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिबॅरेल 60 ते 70 डॉलर असणारा दर आता 100 डॉलर ते 130 डॉलर या दरम्यान झाला आहे भारत 85 टक्क्यांपेक्षा अधिक प्रमाणात तेल आयातीवर अवलंबून असल्याने साहजिकच इंधन दरवाढ अपरिहार्य ठरली. राजकीय कारणास्तव ही दरवाढ निवडणुकांचे निकाल लागेपर्यंत पुढे ढकलण्यात आली आणि आता साधारण आठ रुपयांनी डिझेल आणि पेट्रोल यामध्ये वाढ करण्यात आली. याचे परिणाम आपल्या वैयक्तिक खर्चावर तसेच देशाच्या एकूण अर्थकारणावर मोठ्या प्रमाणात होणार आहेत. ही दरवाढ मोठ्या संकटात रूपांतरित होऊ नये, यासाठी धोरणात्मक उपाय योजना महत्त्वाच्या ठरतात.

इंधन दरवाढ तुलना पेट्रोल आणि डिझेलच्या किमती आपण आठ रुपयांनी वाढवल्या असल्या, तरी एकूण दरवाढ ही 4.2 टक्के ते 4. 5 टक्के इतकी अल्प प्रमाणात असून इतर देशांच्या मध्ये तेलाच्या किमतीत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसते. अमेरिकेत 44.5 टक्के पाकिस्तानमध्ये 55 टक्के, चीनमध्ये 22 टक्के, तर म्यानमारमध्ये 89 टक्के दरवाढ झाली आहे. भारतात मोठ्या प्रमाणात दरवाढ करावी लागली नाही, याचे महत्त्वाचे कारण मुळातच आपले दर अधिक आहेत. भारताच्या तेल आयातीमध्ये रशियामध्ये असणारे स्वस्त तेल उपलब्ध झाले तसेच इतर अनेक राष्ट्रांकडून तेल खरेदी करता आल्यामुळे तेल उपलब्धता अडचण फारशी झाली नाही. तेलाच्या एकूण किमतीमध्ये फक्त 40 टक्के वाटा हा आयात खर्च तसेच प्रक्रिया आणि वाहतूक खर्च यांचा समावेश असतो. उरलेले 60 टक्के हे केंद्र सरकारचा आणि राज्य सरकारचा कर या स्वरूपात आहे. महत्त्वाचे म्हणजे इंधनाच्या किमती कमी असताना त्याचा फायदा जनतेला कमी किमतीच्या स्वरूपात देण्याऐवजी त्याचा उपयोग उत्पन्नवाढीच्या स्वरूपात करण्यात आला. आता मात्र वाढीव तेल किमतीचा भार सर्वसामान्य लोकांच्या खिशावर टाकला जात आहे. या दरवाढीतून महागाईचे चक्र गतिमान होणार असून परिणामतः भाजीपाला किराणा वाहतूक एसटीचे दर आयात वस्तूंच्या किमती या मोठ्या प्रमाणात वाढणार आहेत. सोबत निनो संकट वाट पाहत असून त्याचाही परिणाम शेती क्षेत्रावर होऊ शकतो. यातून भविष्यकाळात महागाईचा दर मोठ्या प्रमाणात वाढण्याचा धोका निर्माण झाला आहे.

**दरवाढीचे परिणामः** इंधनाची दरवाढ अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रावर परिणाम करत असून त्यातून वस्तू उत्पादनाची पुरवठा साखळी अडचणीत येते. कच्चा माल वेळेवर उपलब्ध न होणे, वाहतुकीचा खर्च अधिक असणे यातून उत्पादन घटते आणि किमती पुन्हा वाढतात. भारताच्या चालू खात्यावर तूट निर्माण होणे हे महत्त्वाचे संकट तेल दरवाढीतून निर्माण होते. साधारणपणे इंधनाचे दर दहा डॉलर प्रतिबॅरेल वाढल्यास त्यातून 0.3 ते 0.4 टक्के तूट वाढते. सध्या तेलाचा दर शंभर डॉलरच्या दरम्यान असल्याने चालू खात्यावरील तूट 2.02 टक्के इतकी आहे. यातून दरमहा 56,000 ते 70 हजार कोटी इतकी तूट निर्माण होते. तेल दरवाढीचा परिणाम महागाईचा दर वाढण्यात होतो. किरकोळ महागाई निर्देशांकातील दरवाढीमुळे 4.7 ते 6.9 टक्के इतक्या प्रमाणात वाढू शकतो. रिझर्व्ह बँकेच्या निकषांनुसार महागाईचा दर चार टक्क्यापर्यंतच असणे योग्य असते. त्यामुळे महागाईची चटके सर्वच घटकांना बसतात. राष्ट्रीय उत्पन्नातील वाढ ही सकारात्मक आणि पोषक आर्थिक परिस्थितीवर अवलंबून असते; परंतु वाढती महागाई राष्ट्रीय उत्पन्नावरही परिणाम करते. राष्ट्रीय उत्पन्न प्रतिबॅरेल 10 डॉलरची वाढ झाल्यास ते अर्ध्या टक्क्याने कमी होते. याचाच अर्थ भारताच्या एकूण विकासावर त्याचा मोठा परिणाम होतो. सध्या सात टक्के अपेक्षित असणारा विकासदर सहा टक्क्यांपर्यंत घसरण्याची शक्यता आहे. रुपयाची डॉलरच्या तुलनेत झालेली घसरण याचाही परिणाम तेलाचा खर्च वाढण्यावर आणि तेल किमती वाढण्यावर होतो. विदेशी गुंतवणूकदाराने मोठ्या प्रमाणात निधी काढून घेतल्याने रुपया कमकुवत झाला असून याचा सर्वाधिक फटका बसला आहे. वाढत्या महागाईसोबत मागणी कमी होत असल्याने अनेक उत्पादक कंपन्यांचा नफा कमी होत जातो व त्याने कंपन्यांचे शेअर्स घसरतात. या घसरणीच्या अपेक्षेतून विदेशी गुंतवणूकदार भारतीय शेअर्स विकत असल्याने त्याचा दबाव शेअर बाजारावर दिसतो. इंधन दरवाढीमुळे वाहतूक क्षेत्र तसेच हवाई प्रवास, कृषी उत्पादन, वाहन उद्योग क्षेत्र या सर्वांवर प्रतिकूल परिणाम होतो. विशेषतः खतांच्या किमती वाढल्याने शेती उत्पादनावर आणि खर्चावर मोठा परिणाम दिसतो.

**भविष्यकालीन दिशाः** इंधन दरवाढ ही तात्पुरती समस्या नसून त्यासाठी दीर्घकालीन उपाय योजनेची अत्यंत आवश्यकता आहे. आपले तेलाच्या बाबतीत असणारे परावलंबन 86 ते 87 टक्के इतकी मोठे असून तेल उत्पादनासाठी देशांतर्गत प्रयत्न वाढवणे आवश्यक ठरते. त्याचबरोबर पयार्यी ऊर्जा मार्ग जसे सौरऊर्जा किंवा हरित ऊर्जा याच्या विकासाला प्राधान्य आवश्यक ठरते. याबाबत लक्षणीय प्रमाणात प्रयत्न होत असून भविष्यकाळात तेलावरील पराभवलंबन घटेल. मागणीच्या बाजूने विचार करता सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कार्यक्षम करणे हा महत्त्वाचा पर्याय ठरतो. वैयक्तिक स्तरावर विद्युत वाहनांचा वाढता वापर तसेच सार्वजनिक वाहनांच्या बाबतीतही त्यांच्या वाढता वापर ही चांगली बाब आहे. तेल संकट हे ऊर्जा स्वातंत्र्याकडे नेण्यासाठी आवश्यक साधन म्हणून वापर करणे हा भविष्यकालीन धोरणाचा पाया असला पाहिजे. दरवाढ भविष्यकाळात टिकून राहण्याची शक्यता अधिक आहे. इंधनाचा दर 80 डॉलर प्रतिबॅरेलपर्यंत घसरला, तर ही दरवाढ थोडी कमी होऊ शकते; परंतु आंतरराष्ट्रीय तेल किमती अधिक राहिल्या, तर आणखी दहा ते वीस टक्के दरवाढ अपरिहार्य ठरते.

## वाढदिवसानिमित्त...

## श्री. कौशिक संदिपानजी गायकवाड (तात्यासाहेब) :

# सहकार क्षेत्रातील समर्पणशीलतेचे प्रतिक

सामाजिक चळवळीच्या विकासाकरीता जागरूक विचारांच्या भारतीय नागरिकांना प्रबळ विचार करायला लावणारे, प्रामाणिक लोकसेवेसाठी आपली प्रज्ञा, प्रतिभा अन परिश्रम खची घालणारे, समाजातील प्रत्येक व्यक्तीचं काम करणारे महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्हयातील मोहोळ निवासी सेवाव्रती व अष्टपैलू व्यक्तीमत्व म्हणून श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांना ओळखले जाते. सर्वांबद्दल बंधुत्वाची भावना, आपल्या जीवन निष्ठांमध्ये राष्ट्रनिष्ठेला अग्रक्रम व सर्वोच्च स्थान देण्याची त्यांची वृत्ती असल्याने त्यांची लोकप्रियता सर्वव्यापी आहे. महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्हयातील मोहोळ तालुका ही श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांची कर्मभूमी.

प्रत्येकाच्या अभंग व अत्युच्च कर्तृत्वास मायेचा व प्रतिसादाचा हातं देणारे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांना मोहोळ तालुक्यात 'तात्या' या नावाने ओळखतात. श्री. कौशिक गायकवाड यांना स्वातंत्र्यसेनानी श्री. संदिपान (दादा) गायकवाड यांचे पितृछत्र लाभले. उत्तम संस्कार, नेमके संकल्प आणि निश्चित सिध्दीची शिस्त श्री. कौशिक गायकवाड यांना बालपणीच लाभली.

श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांनी रूळलेल्या वाटेने न जाता नव्या मागार्चा अवलंब करीत नाविन्यपूर्ण पध्दतीने सामाजिक चळवळीच्या प्रांतात ज्ञानाचा, सहकाराचा व लोकल्याणाचा किरण आणणारा सूर्योदय आणला आहे. संपूर्ण समाजकारणाची त्यांची भूमिका आहे. सोलापूर जिल्ह्यासह महाराष्ट्रातील विविध भागांत सामाजिक चळवळीचे कार्य ते करीत आहेत. सामाजिक कार्यासह प्रामुख्याने सहकारी, कृषी, शिक्षण व उद्योग, इत्यादी विविध क्षेत्रांत लक्षणीय कामगिरी त्यांनी केली आहे.

ज्ञान हीच खरी शक्ती, योग्यतेस मान्यता व कमतरतेला परिपूर्णता, थोरांचा सन्मान, युवाशक्तीला मान आणि महिला व बालकांचा उत्कर्ष याला प्रथम स्थान देणारे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांनी मोहोळ तालुका व सोलापूर जिल्हयाच्या विकासाच्या दृष्टीने अनेक पावले उचलली आहेत .

ऊस शेतक-यांना बारमाही पाणी मिळावे हे आग्रही धोरण ठेवून सेवा उद्योगांची वाढ करण्यासाठी त्यांनी विविध संस्था निर्माण केल्या, कार्यक्रम राबविले. त्या अंतर्गत प्रामुख्याने मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित, चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत, चंद्रमौळी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था , इत्यादी संस्थांचा उल्लेख करावा लागतो.

शेतकरी समृध्द करण्यासाठी श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) सतत प्रयत्नशील असतात. स्थानिक शेतक-यांच्या माध्यमातून द्राक्षे, बोरे, डाळींबे, इत्यादी फळांचे उत्पादन वाढवून त्यांना समृध्द करण्याची मोहीम त्यांनी राबविली. शेती आणि दूध उत्पादन या क्षेत्रातही त्यांनी दैदिप्यमान कामगिरी केली आहे. त्याकरीता महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्हयामध्ये 'मोहोळ नागरी सहकारी पतपुरवठा' ही संस्था त्यांनी निर्माण केली. याच क्षेत्रातील ज्ञानी लाकांचे ज्ञान गरजू लोकांपर्यंत पोहोचविणाऱ्या ज्ञानाधिष्ठीत समाज उभारणीचा त्यांचा प्रयत्न आहे.

आपली योजकता, तळमळ, जिव्हाळा, व्यासंग, सहकार धोरण, प्रशासकीय कुशलता, अध्यापन पध्दतींवर असणारे प्रभुत्व, मूल्यमापनाचे यथार्थ ज्ञान, नवनिर्मितीची आवड आणि सृजनशीलता या अंगभूत गुणांच्या जोरावर श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) हे सामाजिक कार्यातील एक उत्तुंग व्यक्तीमत्व ठरतात. लोकांच्या हितासाठी उपलब्ध पायाभूत सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करून तात्काळ कार्य अंमलबजावणी करणे व शाश्वत विकास साधणे ही त्यांची वृत्ती आहे. निसर्गनिर्मित आदर्श व मानवनिर्मित निकष डोळयासमोर ठेवून स्वतःशीच स्पर्धा करीत सकारात्मक बदल अंगीकारत, कोणत्याही परिस्थितीला खंबीरपणे सामोरा जाणारा, 'नवा माणूस' आणि 'नवा समाज' ते निर्माण करीत आहेत.

शिक्षणासाठी अनेक गरजवंतांना ते सातत्याने मदत करीत असतात. साहित्य, कला व संस्कृती, इत्यादी क्षेत्रात काम करणाऱ्या कलावंताना नेहमीच त्यांचा आधार वाटत आला आहे. त्यांचे अपार ग्रंथप्रेम सर्वश्रुत आहे. ज्ञानाला आदर, हुशारीला महत्व, स्वाभिमानाला सन्मान, आत्मविश्वासाला श्वास, कष्टाला बळ आणि बळाला यशाची झेप देणारे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांनी वैद्यकशास्त्र, लेखन, अभिनय, चित्रनाटय,



समाजकारण, उद्योग, विधी, निसर्गोपचार व योगा इत्यादी विभित्र क्षेत्रांमध्ये सकारात्मक लोकसंग्रह निर्माण केला आहे.

उच्च विद्याविभूषित असणारे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांनी मुंबई विद्यापीठातून वैद्यकशास्त्राची पदवी प्राप्त केली. त्यानंतर युवकांसमोरील सर्वात मोठी असणारी बेरोजगारीची समस्या त्यांना जाणवली. त्यामुळे उद्योग उभारणी करून अनेकांना स्वावलंबी करण्याचा त्यांनी निर्णय घेतला व त्यातूनच चंद्रमौळी औद्योगिक वसाहतीची श्री. कौशिक गायकवाड यांनी स्थापना केली. आज त्या वसाहतीत लहान-मोठे असे ४० उद्योग सुरू असून कुशल अकुशल अशा दोन ते तीन हजार गरजवंत लोकांना त्यांनी रोजगार उपलब्ध करून दिला आहे. याच लोकांना रोजगार अथवा उद्योग उभा करण्यासाठी भांडवल मिळावे म्हणून श्री. कौशिक गायकवाड यांनी 'मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा' या संस्थेची स्थापना केली.

लोकहिताच्या जाणिवेतून व्यसनमुक्ती, आरोग्य, शिक्षण, क्रीडा विकास, पर्यटन, कला प्रशिक्षण, सामाजिक सुरक्षा, वित्तीय साक्षरता, राष्ट्रीय कर्तव्य, संस्कार व मूल्यमापन या दृष्टीने विविध स्तरांवर श्री. कौशिक गायकवाड कार्य करीत आहेत. संपूर्ण महाराष्ट्रात विविध कलागुणांनी संस्थात्मक व सामाजिक पातळीवर लौकीक मिळवून देणारी कार्यशील व कृतीशील लोकचळवळ त्यांनी निर्माण केली. प्रगतीशील आधुनिक शेतीला प्रोत्साहन लाभावे , शेतक-यांच्या शेतात सुधारीत पध्दतीने प्रयोग घडून यावेत यासाठी त्यांनी मनामनात नवनिर्मितीचे अधिष्ठान निर्माण केले. त्यासाठीच त्यांनी स्वातंत्र्यसेनानी श्री. संदिपान (दादा) गायकवाड या संस्थेच्या माध्यमातून दरवर्षी कृषी पुरस्कारांना प्रारंभ केला. दरवर्षी पत्रकार मार्गदर्शन व प्रशिक्षण कार्यक्रमांचे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) आयोजन करतात.

नैसर्गिक आपत्तीच्या वेळी आपत्तीग्रस्तांना अन्नदान, कपडे व आर्थिक मदतीचा हात देवून समर्पित सामाजिक कार्य करण्याचे काम श्री. कौशिक गायकवाड करीत असतात. मागील दिवसांमध्ये कोरोना महामारीच्या काळात मोठया प्रमाणावर पीपीई कीट, मास्क, सॅनिटायजर, ऑक्सिमीटर, टेम्प्रेचर चेक मशीन, अशा अत्यावश्यक वस्तुंचे त्यांनी विनामूल्य वाटप केले. मन व जीवनाच्या व्यवस्थापनासह सामाजिक सेवा क्षेत्राचे यशस्वी व्यवस्थापन श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांनी केले आहे . त्यांचे विचार अन कृती हे उत्तम संस्कारीक धन आहे.

स्वतःला विसरून एखाद्या कामामध्ये झोकून दिलं पाहिजे असं बरेचदा लिहिलं किंवा बोललं जातं . पण प्रत्यक्षात झोकून देणं कशाला म्हणतात याचं जीवंत उदाहरण महणजे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) होत. त्यांच्या कामाची धडाडी एवढी प्रचंड की समोरच्यांना धडकी भरावी. पण त्यांच्या त्या कामातही नियोजन, शिस्त व रेखीवपणा असतो.

त्यांचा कार्यानुभव देखील तेवढाच अफाट आहे. सहकार, कृषी, वित्त, सामाजिक, आरोग्य, इत्यादी विविध क्षेत्रातील क्रियान्वीत असणाऱ्या संस्थांच्या प्रमुखपदाची जबाबदारी त्यांच्याकडे आहे. त्या अंतर्गत महाराष्ट्राच्या सोलापूर जिल्हयातील प्रामुख्याने मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा मर्यादित चे अध्यक्ष, चंद्रमौळी औद्योगिक सहकारी वसाहत चे अध्यक्ष, चंद्रमौळी ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष, स्वातंत्र्यसेनानी श्री. संदिपान (दादा) गायकवाड सामाजिक संस्थेचे अध्यक्ष, मोहोळ विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्यादित चे अध्यक्ष, कृषी उत्पन्न बाजार समिती, मोहोळ चे सभापती , मोहाळ तालुका पंचायत समितीचे उपसभापती, मोहोळ तालुका देखरेख संघाचे अध्यक्ष, मोहोळ नागरी सहकारी पत पुरवठा संस्था मर्यादित चे उपाध्यक्ष, सुर्या सिनजी प्रा.लि. चे अध्यक्ष , लोकनेते बाबुराव पाटील सहकारी साखर कारखाना मर्यादित चे संचालक, वरद ॲग्रो फार्मर्स प्रोडयुसर कं. लि. चे संचालक , सोलापूर जिल्हा जागतिक मानवाधिकार संघटनेचे अध्यक्ष, श्री. सिध्देश्वर सहकारी सुत गिरणी मर्यादित चे संचालक, श्री. राजन पाटील मित्र मंडळाचे अध्यक्ष, इत्यादी विविध महत्वाच्या पदांवर ते कार्यरत आहेत.

आपल्या दैनंदिन जीवनातून नव्या पिढीला ध्येयवादी बनविण्याची, वैज्ञानिक दृष्टीकोन व नैतिक मूल्यांचे संस्करण करण्याची ऐतिहासिक जबाबदारी श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) पार पाडीत आहेत. त्यातूनच जातीय सलोखा, राष्ट्रीय ऐक्य आणि विविधतेतून एकता जोपासण्याची भारतीय परंपरा त्यांनी कुठल्याही परिस्थितीत खचून न जाता जोपासली आहे. मग ग्रामीण भागातील युवकांनी स्पर्या परीक्षेच्या माध्यमातून प्रशासनात कर्तृत्व गाजवावं म्हणून स्वातंत्र्यसेनानी श्री. संदिपान (दादा) गायकवाड स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व अभ्यास केंद्राची केलेली स्थापना असो की गरजवंत विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी अधिक मदतीच्या माध्यमातून सामाजिक परिवर्तनाच्या दिशेने टाकलेलं पुरोगामी पाऊल असो की विभिन्न युवक परिषदांच्या माध्यमातून समाजाला प्रेरणा व प्रोत्साहन देणारं कुठलही विधायक काम असो की नारी कल्याण व नारी उत्थानाची कल्याणकारी वाट असो की उच्चशिक्षणासाठी जागतिक विद्यापीठांमध्ये प्रवेशासाठी धडपडणा-या लायक विद्यार्थ्यांना वेळोवेळी केलेली भक्कम मदत असो की उद्योगाच्या माध्यमातून बेरोजगारांना जीवनाची प्रगतीशील दिशा दाखविणारे प्रबळ असे सामाजिक कार्य असो की अनेकांचे पालकत्व घेवून गोरगरीब मुलींचे केलेले कन्यादान असो की रुग्णसेवा व वृद्धसेवेच्या संदर्भाने केलेली मानवसेवा असो, अशा विविध प्रसंगी श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांच्या ठायी असलेली धडाडीने लोकसेवा करण्याची तळमळ त्यातून प्रतिबिंबित होते .

स्वतः वैद्यकशास्त्राचं (औषधनिर्माण) स्नातक पदवीधर असलेले श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांनी सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून गोरगरीब जनतेला तातडीची व अल्पदरात वैद्यकीय सेवा मिळावी म्हणून मेडीकल सुरू केले. केवळ चर्चेनं समस्या सोडविण्याचा प्रयत्न करू पाहणारे अनेक महाभाग असतात, मात्र कुणाच्याही समस्या आपल्या समजून 'बोले तैसा चाले, त्याची वंदावी पाऊले' या संतवाणीचे पालन करीत प्रत्यक्ष कृतीतून समस्याग्रस्त व्यक्ती व समाजाशी तादात्म्य पावणारे श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांची कार्यशैली पाहून मन विस्मयाने थक्क होते.

अत्यंत मितभाषी, संयमी , निगर्वी व दिलदार स्वभाव असलेले श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) हे व्यक्तीमत्व म्हणजे जाणीवेचा सच्चेपणा व भावनेचा ओलावा यांचा हृदयस्पर्शी संगम होय. दुःखीतांचे अश्रू पुसण्यासाठी व दिलेला शब्द पाळण्यासाठी ते सदैव तत्पर असतात. अंगभूत जिद्द , महत्वाकांक्षा, साहस व चिकाटी या गुणांच्या बळावर प्रत्यक्ष परिस्थितीला मागे टाकणारे सामर्थ्य बालपणीच श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) यांच्या बाजूदंडात समावलं होतं , म्हणूनच आज खऱ्या अर्थाने त्यांनी वडील श्री. संदिपान (दादा) गायकवाड यांचे शब्द साकार केले आहेत . जीवनाच्या लढाईत श्री. कौशिक गायकवाड (तात्यासाहेब) विजयी ठरले आहेत, ते यामुळेच.

**ॲड. क्रांती महाजन,**
बॉम्बे हायकोर्ट
+91 89838 71407

# कलाकारांचा सन्मान आणि सिने सृष्टीच्या विकासासाठी समर्थ पॅनलला पाठिंबा - भाऊसाहेब भोईर

**पिंपरी, पुणे (कटूसत्य वृत्त):-** कलाकारांचा सन्मान आणि सिने सृष्टीच्या विकासासाठी अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या निवडणुकीत समर्थ पॅनलच्या सर्व अधिकृत उमेदवारांना बहुमताने निवडून द्यावे असे आवाहन अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर यांनी केले.

अखिल भारतीय मराठी चित्रपट महामंडळाच्या २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी ७ जून रोजी मतदान होणार आहे. या निमित्त शनिवारी पिंपरी येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत भाऊसाहेब भोईर बोलत होते. यावेळी समर्थ पॅनलचे निमार्ता पदाचे अधिकृत उमेदवार मेघराज राजे भोसले, सुनील महाजन, दिग्दर्शक पदाचे उमेदवार अजित शिरोळे, लेखक पदाचे उमेदवार राज काझी तसेच गौरी लोंढे, संजय ठुबे आदी उपस्थित होते.

यावेळी नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध करून देण्यासाठी आणि सर्व घटकांना एकत्रितपणे पुढे नेण्यासाठी समर्थ पॅनल कार्यरत राहील. मराठी चित्रपटसृष्टीच्या विकासासाठी समर्थ पॅनलला सर्व सभासद भरघोस मतदान करतील असा विश्वास भाऊसाहेब भोईर यांनी यावेळी व्यक्त केला.

मेघराज राजे भोसले यांनी सांगितले की, मराठी चित्रपट आणि कलाकारांच्या विकासासाठी



समर्थ पॅनल आता सक्षम आहे. मराठी चित्रपट सृष्टीचा विकास हे ध्येय समोर ठेवून भाऊसाहेब भोईर यांनी स्वतःचा उमेदवारी अर्ज मागे घेऊन निमार्ता गटाच्या दुसऱ्या पदासाठीचे उमेदवार सुनील महाजन यांना जाहीर पाठिंबा दिला, असे मोठ्या मनाचे आणि उत्तुंग व्यक्तिमत्व असणारे भाऊसाहेब भोईर यांचा पाठिंब्यामुळे समर्थ पॅनल आता आणखी समर्थ झाले आहे. मराठी चित्रपट सृष्टीच्या सर्व घटकांचे प्रतिनिधित्व करणारे अनुभवी, अभ्यासू आणि कार्यक्षम उमेदवार समर्थ पॅनल तर्फे निवडणूकीत उभे राहिले आहेत. मराठी चित्रपट सृष्टीतील कलाकार, तंत्रज्ञ, निमार्ते, दिग्दर्शक, लेखक, कामगार आणि विविध क्षेत्रांतील प्रतिनिधींना न्याय देणारे प्रभावी नेतृत्व मिळावे, या उद्देशाने 'कलाकारांचा सन्मान - मराठी सिनेसृष्टीचा विकास' हे ब्रीदवाक्य घेऊन आम्ही निवडणूक लढवत आहे. या सर्व उमेदवारांना पतंग या चिन्हावर बटन दाबून प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन पॅनल प्रमुख ज्येष्ठ निर्माता गटाचे उमेदवार मेघराज राजे भोसले यांनी केले.

समर्थ पॅनल मधील इतर अधिकृत उमेदवार निमार्ता गटाच्या दुसऱ्या पदासाठी सुनील महाजन, दिग्दर्शक पदासाठी दीपक कदम (मुंबई), अभिनेता पदासाठी सुशांत शेलार (मुंबई), छायाचित्रण पदासाठी धनाजी यमकर (कोल्हापूर), नृत्य पदासाठी सुभाष नकाशे (मुंबई), ध्वनी पदासाठी शरद चव्हाण (कोल्हापूर), कलादिग्दर्शक प्रवीण (वासू) पाटील (सातारा), वेशभूषा पदासाठी चैत्राली डोंगरे (मुंबई), निर्मिती व्यवस्था पदासाठी रवी गावडे (कोल्हापूर), प्रसिद्धी पदासाठी गणेश गारगोटे (मुंबई), कामगार पदासाठी विकास तोरणे (कोल्हापूर) यांचा समावेश आहे.

समर्थ पॅनलने मराठी चित्रपट सृष्टी समोरील विविध प्रश्न सोडविणे, कलाकार व तंत्रज्ञांच्या हक्कांचे संरक्षण करणे, रोजगाराच्या नव्या संधी निर्माण करणे, डिजिटल माध्यमांशी सुसंगत धोरणे राबविणे, तसेच महामंडळ अधिक सक्षम आणि पारदर्शक बनविणे यासाठी कटिबद्ध असल्याचे सुनील महाजन यांनी सांगितले.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृह, अक्कलकोट येथे प्रवेश प्रक्रिया सुरू

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अक्कलकोट येथील शासकीय विश्रामगृह शेजारी असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय वसतिगृहाची सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठीची वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू करण्यात आलेली आहे. प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज भरण्याची प्रक्रिया दि. २५ मे २०२६ पासून सुरू झाली आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वषार्साठी इच्छुक व पात्र विद्यार्थ्यांनी दि. २५ मे २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत ऑनलाईन अर्ज करावेत.

विद्यार्थ्यांना https://hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करता येणार आहेत.

वसतिगृहात प्रवेशित पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य, गणवेश, निर्वाह भत्ता तसेच वसतिगृहात राहण्याची, नाश्ता व दोन वेळच्या जेवणाची मोफत सुविधा उपलब्ध करून देण्यात येते.

तरी गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन वसतिगृहाचे गृहपाल श्री. व्ही. जे. देवकते यांनी केले आहे.

# प्रतिबंधित गुटखा पानमसाल्याचा १. २१ लाखांचा साठा जप्त

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** अन्न व औषध प्रशासनाच्या सोलापूर कार्यालयाने गुटखा, पानमसाला आणि मावा यांसारख्या प्रतिबंधित अन्नपदार्थाविरोधात विशेष मोहीम राबवून धडक कारवाई केली. २५ ते २९ मे या कालावधीत करण्यात आलेल्या सहा कारवायांमध्ये १ लाख २१ हजार ३७२ रुपयांचा प्रतिबंधित साठा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी सहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलमांतर्गत तसेच अन्न सुरक्षा व मानके सोलापुरात अन्न व औषध प्रशासनाची कारवाई




अधिनियम २००६ मधील कलम २६, २७, ३० व ५९ अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले असल्याची माहिती अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त साहेबराव देसाई यांनी दिली. कारवाईदरम्यान सुमारे ५० हजार रुपये किमतीचे एक वाहन जप्त करण्यात आले असून पाच आस्थापनांना सील ठोकण्यात आले आहे.

आयुक्त तुकाराम मुंढे यांनी पदभार स्वीकारल्यानंतर पुणे विभागाचे सहआयुक्त भोगावडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरक्षा अधिकाऱ्यांनी गोपनीय माहितीच्या आधारे ही मोहीम राबवली. प्रतिबंधित अन्नपदार्वांची विक्री, उत्पादन, साठवणूक अथवा वाहतूक करणायांविरोधात यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. नागरिकांनी अशा प्रकारच्या तक्रारीसाठी अन्न व औषध १८००-२२२-२३६५ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधून सहकार्य करावे, असे आवाहनही करण्यात आले आहे.

## वात्रटिका

### जिद्दी नेता

रणरण उन्हात उपोषण,पण
चटका दुसऱ्याला बसला...
लपून बसलेला नेताजी पुन्हा
बडबडत माईकपुढं दिसला...
जात पात न बघता नेता अभ्यासा
चिकाटी त्याची, त्याचा हेका...
पुढारपण करणाऱ्यानो जरा
नावे ठेवण्यापेक्षा जिद्द शिका...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
**8698067566**

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या आदर्श विचारांचा समाजाने वारसा जपावा : रंजिताताई चाकोते

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त भवानी पेठ घोंगडे वस्ती परिसरातील बिरूलिंगेश्वर धनगर समाज संघटना यांच्या वतीने धार्मिक वातावरणात श्रींची महापूजा आयोजित करण्यात आली सोलापूर महानगरपालिकेच्या स्थायी समिती सभापती सौ. रंजिताताई सकलेश चाकोते यांच्या शुभहस्ते महापूजा संपन्न झाली यावेळी बोलताना रंजिताताई चाकोते म्हणाल्या की, पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांनी न्याय, धर्म, लोककल्याण आणि समाजहित यांचा आदर्श घालून दिला. देशभरातील मंदिरांचे जतन, घाट, विहिरी, धर्मशाळा



उभारून त्यांनी जनसेवेचा आदर्श निर्माण केला. त्यांचे कार्य आजही प्रेरणादायी असून समाजाने त्यांच्या विचारांचा वारसा जपून समाजहितासाठी कार्य केले पाहिजे.

याप्रसंगी सौ. रंजिताताई चाकोते यांचा सत्कार निलम्मा मंदकल व नागम्मा गंदाळकर यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमास समाजाचे ज्येष्ठ आधारस्तंभ तथा माजी सभागृह नेते सुरेश पाटील प्रमुख उपस्थित होते. यावेळी शरणप्पा डोळे, नरसप्पा मंदकल, युवक नेते विनायक पाटील, गंगाराम डोळे, मुदक्का करली, सुरेश मंदकल, बिपीन भैय्या पाटील, शिवा मंदकल, सिद्राम हळ्ळी, सिद्राम मंदकल, विजय कोळी, लिंगराज मासरेड्डी, अमर गंजेळी, प्रविण डोळे, नवीन गोटीमुकूल, रवि मंदकल, सिद्राम डोळे, अंबादास कडगुड्डा, नागेश गंदाळ, संतोष कोळी यांच्यासह मोठ्या संख्येने समाजबांधव उपस्थित होते.

कार्यक्रमात राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन, महाआरती व त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यात आले. धार्मिक आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाने समाजात एकात्मता, संस्कार आणि समाजसेवेचा संदेश दिला.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जयंतीनिमित्त सोलापूर शहरातील पार्क चौक येथील त्यांच्या पुतळ्यास सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अहिल्यादेवी होळकर यांच्या लोककल्याणकारी कार्याचा, न्यायप्रिय प्रशासनाचा तसेच समाजहितासाठी केलेल्या योगदानाचा गौरवपूर्वक उल्लेख करण्यात आला.या अभिवादन कार्यक्रमास सभागृह नेते नरेंद्र काळे, नगरसेवक चेतन नरोटे, विनोद भोसले, नगरसेविका सौ. संगीता जाधव, सौ. मनीषा माने, सौ. शशिकला कस्पटे, तसेच नागेश खरात, सागर पिसे, बिरप्पा बंडगर, लखन गावडे, सोपान खांडेकर, राम वाकसे, राज बंडगर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करून त्यांच्या विचारांचा व आदर्श कार्यपद्धतीचा वारसा जतन करण्याचा संकल्प व्यक्त केला. जयंतीनिमित्त परिसरात उत्साहाचे वातावरण असून विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

# सोलापूर -पुणे हायवेवर ट्रकची दुचाकीला धडक; एका तरुणाचा मृत्यू





**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** रविवार ३१ मे २०२६ रोजी सकाळी सात वाजण्याच्या सुमारास पुणे सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर अरण गावाच्या हद्दीत एच. पी. पेट्रोल पंपाजवळ पुण्यावरून सोलापूर येथे जात असलेल्या एका भरधाव ट्रक क्रमांक MH 14 KQ 1006 ने एका दुचाकी क्रमांक MH 45 J 1387 ला समोरून जोरदार धडक दिल्यामुळे झालेल्या अपघातात दुचाकीस्वार तरुणाच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्या तरुणाचा जागीच मृत्यू झाला.

सदर अपघातामध्ये मृत्यू झालेल्या तरुणाला वरवडे टोल नाका येथील रुग्णवाहिकेमधून डॉ प्रशांत कारंजकर आणि रुग्णवाहिका चालक बंडू गायकवाड यांनी मोडनिंब येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनासाठी दाखल करण्यात आले असून या अपघाताची माहिती मिळताच वरवडे टोल नाका येथील ग्रस्तीपथक आणि मोडनिंब महामार्ग पोलिस मदत केंद्राचे अधिकारी उमेश पवार (PSI) आणि त्यांचे कर्मचारी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले.

या अपघातामध्ये मृत्यू झालेल्या तरुणाचे नाव तुषार गणेश सावंत रा. अरण ता. माढा, जिल्हा सोलापूर, आहे. या सदर अपघाताची माहिती टेंभूर्णी पोलिस स्टेशन येथील अपघात विभागाचे अधिकारी जगताप आणि सरडे यांना वरवडे टोल नाका येथील ग्रस्तीपथक प्रमुख विजय साळुंके यांनी दिली आहे.

# विठ्ठलवाडीचे अनिलकुमार बरकडे यांना राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान

**माढा (कटूसत्य वृत्त):-** अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या 32 व्या संमेलनात माढा तालुक्यातील विठ्ठलवाडीचे सुपुत्र तथा केवडच्या भैरवनाथ प्रशालेचे मुख्याध्यापक अनिलकुमार दत्तात्रय बरकडे यांना 33 वर्षांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेच्या वतीने दिला जाणारा महात्मा फुले राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार-2026 संमेलनाध्यक्ष डॉ.नंदकुमार राऊत यांच्या हस्ते व स्वागताध्यक्ष आमदार कैलास घाडगे-पाटील,शिक्षक आमदार विक्रम काळे व परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष निमंत्रक साहित्यिक डॉ.



शरद गोरे यांच्या प्रमुख उपस्थितीत धाराशिव येथे स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र, शाल व पुष्पगुच्छ देऊन प्रदान करण्यात आला.

अनिलकुमार बरकडे यांनी 33 वर्षांच्या शैक्षणिक सेवेत विद्यार्थ्यांना इंग्रजी विषयाचे उत्कृष्ट पद्धतीने अध्यापन केले. विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास व गुणवत्ता वाढीसाठी विविध शालेय व सहशालेय उपक्रम राबविले.त्यांनी इंग्रजी विषयाची 10 वीच्या बोर्डाच्या निकालाची उज्वल परंपरा कायम ठेवली आहे.त्याबद्दल त्यांना या मानाच्या राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्काराने समारंभपूर्वक सपत्नीक गौरविण्यात आले आहे.

यावेळी साहित्य परिषदेचे विश्वस्त चेअरमन अनिलकुमार अनभुले,कवी फुलचंद नागटिळक,गोरक्षनाथ भांगे, संतोष अनभुले,आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड,स्मिता बरकडे, डॉ.तानाजी जाधव,अर्चना जाधव,विशाल अनभुले, ओमराज सावंत यांच्यासह लेखक,कवी,साहित्यिक व शिक्षक उपस्थित होते.

# बेपत्ता 10 वर्षीय मुलगी अवघ्या 7 तासांत नातेवाईकांच्या स्वाधीन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर गुन्हे शाखेने तत्परता दाखवत बेपत्ता झालेल्या 10 वर्षीय मुलीचा अवघ्या सात तासांत शोध घेऊन तिला सुरक्षितपणे तिच्या नातेवाईकांच्या स्वाधीन केले आहे.

अर्पिता मल्लिकार्जुन बागले (वय 10, मूळ रा. माळकवठे, ता. दक्षिण सोलापूर) ही मुलगी सध्या सोलापूर येथील बसवनगर, भवानी पेठ परिसरात आपल्या नातेवाईकांकडे राहत होती. दिनांक 29 मे 2026 रोजी सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास ती घराबाहेर गेल्यानंतर बेपत्ता झाली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता 2023 च्या कलम 137(2) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.



घटनेची माहिती मिळताच पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त (गुन्हे) डॉ. अश्विनी पाटील तसेच सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) राजन माने यांनी गुन्हे शाखेच्या अधिकाऱ्यांना मुलीचा तातडीने शोध घेण्याच्या सूचना दिल्या.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेच्या पथकाने घटनास्थळ तसेच परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची बारकाईने तपासणी केली. तपासादरम्यान मुलगी कुमठा नाका, मंगळवार पेठ, टिळक चौक मार्गे अश्विनी हॉस्पिटलकडे गेल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार पोलिसांनी विविध ठिकाणी शोधमोहीम सुरू ठेवली.

दरम्यान, मुलगी अश्विनी हॉस्पिटल ते रिमांड होम परिसरात दिसल्याची माहिती पोलीस अंमलदार संजय साळुंखे यांना मिळाली. त्यानुसार पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड व इतर कर्मचाऱ्यांनी तात्काळ त्या ठिकाणी धाव घेत शोधकार्य सुरू केले. अखेर अर्पिता ही मुलगी सुरक्षित अवस्थेत आढळून आली.

पोलिसांनी मुलीकडे चौकशी केली असता ती रस्ता चुकल्याने घराचा शोध घेत फिरत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर तिची ओळख पटवून नातेवाईकांच्या उपस्थितीत तिची सुखरूपपणे त्यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राजकुमार, पोलीस उपआयुक्त डॉ. अश्विनी पाटील, सहायक पोलीस आयुक्त राजन माने आणि वरिष्ठ पोलीस निरीक्षक अरविंद माने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक मुकेश गायकवाड तसेच नंदराम गायकवाड, अंकुश भोसले, वाजिद पटेल, योगेश बर्डे, महेश शिंदे, शैलेश बुगाडे, संजय साळुंखे, अभिजय माने, अमितीत धायगुडे, काशिनाथ वाघे, भारत पाटील, सिद्धाराम देशमुख, धीरज सातपुते, सुभाष मुंडे, चालक बाळासाहेब काळे व श्याम सुरवसे यांनी पार पाडली.

# टेंभुर्णी-अकलूज एसटी बससेवेचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते उद्घाटन

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** माढा तालुक्याच्या पश्चिम भागातील नागरिकांची अनेक वर्षांची मागणी अखेर पूर्ण झाली असून टेंभुर्णी-अकलूज (रांजणी, भिमानगर, आलेगाव बु., रुई, आलेगाव खुर्द, गार अकोले, बावडा मार्गे) या नव्या एसटी बससेवेचा शुभारंभ महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या हस्ते करण्यात आला. या बससेवेच्या प्रारंभामुळे पश्चिम भागातील विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी तसेच ज्येष्ठ नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे.

या उद्घाटन प्रसंगी शिवसेना पक्षाचे उपनेते व माजी खासदार राहुल शेवाळे, राज्यसभा खासदार ज्योती वाघमारे, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माढा लोकसभा संपर्कप्रमुख तथा डबल महाराष्ट्र केसरी चंद्रहार पाटील आणि या बससेवेसाठी सातत्याने पाठपुरावा करणारे शिवसेना नेते संजय (बाबा) कोकाटे उपस्थित होते. मान्यवरांच्या हस्ते एसटी बसची पूजा करून हिरवा झेंडा दाखवत बससेवेचा शुभारंभ करण्यात आला.

पश्चिम भागातील नागरिकांचे शैक्षणिक, व्यावसायिक व दैनंदिन व्यवहार प्रामुख्याने अकलूज, टेंभुर्णी, पानीव आणि सराटी या भागांशी संबंधित आहेत. मात्र या परिसरात नियमित सार्वजनिक वाहतुकीची सुविधा उपलब्ध नसल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. विशेषतः विद्यार्थी, महिला आणि वयोवृद्ध नागरिकांना प्रवासासाठी खासगी वाहनांवर अवलंबून राहावे लागत होते. त्यामुळे या मार्गावर एसटी बससेवा सुरू करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत होती.

लोकांच्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी सुमारे दोन महिन्यांपूर्वी विशेष बाब म्हणून ही बससेवा सुरू करण्याचे आदेश दिले होते. मात्र रांजणी-भिमानगर ते गार अकोले या मार्गावरील रस्त्याचे काम सुरू असल्याने व अनेक ठिकाणी खोदकाम झाल्यामुळे बससेवा तातडीने सुरू होऊ शकली नव्हती. अलीकडेच रस्त्याचे काम पूर्ण झाल्यानंतर परिवहन विभागाने आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून ही बससेवा सुरू केली.

या बससेवेबाबत परिसरातील नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, दीर्घकाळ प्रलंबित असलेली मागणी पूर्ण झाल्याची



भावना व्यक्त केली जात आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या दैनंदिन गरजा, शिक्षण, आरोग्य व रोजगाराच्या दृष्टीने ही बससेवा अत्यंत उपयुक्त ठरणार असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले.

यावेळी बोलताना संजय (बाबा) कोकाटे यांनी सांगितले की, शिवसेना पक्षप्रमुख तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली सामान्य जनतेच्या प्रश्नांना प्राधान्य देण्यात येत असून, त्यांच्या मार्गदर्शनामुळेच पश्चिम भागातील नागरिकांची ही महत्त्वाची मागणी पूर्ण झाली आहे.

**बससेवेचे वेळापत्रक पुढीलप्रमाणे :**

- सकाळी ९.०० वाजता – टेंभुर्णी ते अकलूज
- सकाळी ११.०० वाजता – अकलूज ते टेंभुर्णी
- दुपारी ४.०० वाजता – टेंभुर्णी ते अकलूज
- सायंकाळी ६.०० वाजता – अकलूज ते टेंभुर्णी

या नव्या बससेवेमुळे पश्चिम भागातील गावांचा टेंभुर्णी व अकलूजशी थेट संपर्क प्रस्थापित झाला असून शिक्षण, आरोग्य, व्यापार व दैनंदिन प्रवासासाठी मोठी सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे या निर्णयाचे परिसरातील नागरिकांकडून स्वागत करण्यात येत आहे.

# आचारसंहितेमुळे जिल्हा लोकशाही दिन रद्द

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाचे शासन परिपत्रक दिनांक २६ सप्टेंबर, २०१२ नुसार तालुका, जिल्हा/महानगरपालिका, विभागीय व मंत्रालय स्तरांवरील लोकशाही दिन अंमलबजावणीबाबत एकत्रित आदेश दिलेले आहेत. उक्त परिपत्रकातील कलम ५.७ नुसार ज्या क्षेत्रांमध्ये निवडणुकीकरीता आचारसंहिता लागू असते, त्या स्तरावरील लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात दरमहा पहिल्या सोमवारी जिल्हा लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. मात्र राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांचे पत्र दि. १८.०५.२०२६ नुसार महाराष्ट्र विधान परिषदेच्या सोलापूर मतदारसंघाच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठी आचारसंहिता दि. १८ मे २०२६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे दि. ०१ जून २०२६ रोजी होणारा जिल्हा लोकशाही दिन आयोजित केला जाणार नाही, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली आहे.


## जाहीर प्रगटन

**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार तुळजापुर यांचे कार्यालय**

प्रकरण क्र. 845/2025

**प्रकरण:- जन्म प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

अर्जदार दादासाहेब काशिम शेख रा. केमवाडी ता. तुळजापूर जि.धाराशिव येथील रहीवासी असून अर्जदार यांनी त्यांचा स्वःता नामे दादासाहेब काशिम शेख यांचा जन्म दिनांक 01.09.1975 रोजी राहते घरी केमवाडी येथे झाला आहे. याबाबत त्यांचे जन्म नोंदणीचे प्रमाणपत्र द्यावे यासाठी या कार्यालयात अर्जदार यांनी प्रस्ताव दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदर जाहीर प्रगटनाद्वारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर जन्म नोंदीबाबत कोणाचाही कोणताही आक्षेप असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत उक्त न्यायालयात लेखी स्वरुपात आक्षेप सादर करावा. जर नमुद केलेल्या कालावधीमध्ये कोणाचाही आक्षेप आला नाही तर संबंधीत प्रकरणात कायद्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही केली जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक 13.04.2026 रोजी माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्यानिशी दिले आहे.

**नायब तहसिलदार (महसुल)**
तहसिल कार्यालय, तुळजापुर



## Classified - छोटी जाहीरात

### निर्मल व्यसनमुक्ती केंद्र

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अँडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

### बोअरवेल

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क – शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)

### अथर्व पेस्ट कंट्रोल

An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

### पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता
**सिक्युरिटी गार्ड**
त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ – 11:30 ते 2 वा.

### वर-वधू




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड्व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदन:** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) एकवीस दुणे
२) लिंबू पाण्याचे पेय ३) कजरा उलट लिहा ४) तय उलट लिहा
५) कोकणातील एक स्ट्राँग नेते
६) परंतु (हिंदीत) ७) पत्र (इंग्रजीत)
१०) ग्रॅज्युएट (मराठीत)
१२) थंड, शीत १५) ॲडव्होकेट (मराठीत)
१६) राजाबाबू चित्रपटातील गोविंदाचा पालक असलेला अभिनेता १७) बारा वर्षांचा काळ १९) एक फळ २०) देखणा, रूबाबदार व्यक्तिमत्त्व २१) फेब्रुवारी (हिंदीत) २३) सहा उलट लिहा २५) झी टीव्हीवरील विनोदी मालिका- चला ** येऊ द्या २६) कॉलनी (मराठीत) २७) वडिलोपार्जित असलेला संपत्तीचा हक्क
३०) याचे कणीस भाजून खातात
३१) उत्सवाचा दिवस
३३) वस्तूची विक्री ३४) हिंदी सिनेसृष्टीतील एक अभिनेता, दीपिकाचा पती-**** सिंह ३५) दैत्य, दानव ३६) राखण, एकनाथ खडसेंच्या सून-** खडसे ३८) रोख
४१) वाट, मार्ग (हिंदीत)
४३) उदार मनाने देणे, ** करणे

**आडवे शब्द :**
१) बिहारमधील एक प्रख्यात जिल्हा व लोकसभा मतदारसंघ
५) महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष
८) चांदी ९) बस अथवा ट्रकच्या केबिनचे छत
११) बगळा १२) गाणे गाणारा १३) दात, दंत
१४) नवऱ्याची दुसरी बायको १६) सबब, निमित्त
१८) शरीर (हिंदीत) १९) गुन्हा २१) सब्र का ** मिठा होता है
२२) एक भारतीय फलंदाज-अजिंक्य *** २४) तरचा साथीदार
२५) निश्चित, खात्रीशीर २६) श्रीरामाने चौदा वर्षे भोगला तो
२८) जंगल अथवा डोंगराला लागलेली आग २९) माहेरच्या विरूध्दार्थी शब्द
३१) सल्ला (हिंदीत) ३२) शुगर (मराठीत)
३५) पॉलिटिक्स (मराठीत) ३७) शरीर, काया ३९) परंतु, शर्थ
४०) चित्त, ध्यान, लाख
४२) हनुमानाच्या हातातील शस्त्र
४४) दहा गुणिले सात
४५) पुणे लगतचा एक जिल्हा

## सुडोकु - 265

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | | 1 | | | 3 | 9 | | 6 |
| | | 9 | | | 7 | 8 | 5 | |
| 2 | 5 | | 1 | | | 4 | 7 | |
| 5 | | | | 6 | 1 | 7 | | 4 |
| 7 | 6 | | 8 | 3 | | | | |
| | 3 | 2 | | | | | | |
| | 2 | | | 1 | 9 | 5 | | |
| | | 5 | | | | 3 | | 2 |
| | | | 4 | 5 | 2 | 1 | 9 | 7 |

# शहर उत्तरच्या रस्ते विकासासाठी २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघातील रस्ते वाहतुकीची कोंडी फोडण्यासाठी आणि नागरिकांना उत्तम पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी आमदार विजयकुमार सि. देशमुख (मालक) यांच्या विशेष निधीतून तब्बल २२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या निधीमुळे मतदारसंघातील दोन महत्त्वाच्या रस्त्यांचा कायापालट होणार आहे.



मतदारसंघातील नागरिकांचा प्रवास अधिक सुरक्षित, सुकर आणि गतीमान व्हावा यासाठी आमदार विजयकुमार देशमुख शासनाकडे सातत्याने पाठपुरावा करत होते. त्यांच्या या प्रयत्नांना यश आले असून, शासकीय मंजुरीचे अधिकृत पत्रही प्राप्त झाले आहे.

**'या' दोन प्रमुख रस्त्यांचे होणार भाग्य पालटणार:**

मंजूर झालेल्या २२ कोटी रुपयांच्या निधीमधून खालील दोन मुख्य मार्गांचे काम हाती घेतले जाणार आहे: १. बाळे ते देगाव रोड २. खेड ते केगाव रोड

**दर्जेदार आणि जलद कामाची ग्वाही:**

या निधीच्या मंजुरीबाबत बोलताना आमदार विजयकुमार देशमुख यांनी सांगितले की, "सोलापूर शहर उत्तर परिसराचा सर्वांगीण विकास करणे हेच आमचे ध्येय आहे. मंजूर झालेल्या या निधीतून रस्त्यांची कामे अत्यंत उच्च दर्जाची (क्वालिटी) आणि जलद गतीने पूर्ण केली जातील, जेणेकरून नागरिकांना लवकरच याचा फायदा होईल."

या मोठ्या निधीच्या मंजुरीमुळे बाळे, देगाव, खेड आणि केगाव परिसरातील नागरिकांमधून आणि वाहनधारकांमधून आनंद व्यक्त केला जात असून, आमदार विजयकुमार देशमुख यांचे आभार मानले जात आहेत.

# जनकल्याण राज्यस्तरीय गौरव पुरस्कार बुधवारी वितरण समारंभ

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):** जनकल्याण मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या चौदाव्या वर्धापन दिनानिमित्त जनकल्याण मल्टीस्टेट व जनकल्याण फाऊंडेशन, सोलापूर यांच्या वतीने १ ते ३ जून २०२६ दरम्यान हुतात्मा स्मृती मंदिर येथे दररोज सायंकाळी ६ वाजता विविध सांस्कृतिक, मनोरंजनात्मक व गौरव सोहळा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती संस्थापक अध्यक्ष राजेंद्र हजारे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

सोमवार, दि. १ जून रोजी सायंकाळी ६ वाजता सिने अभिनेते कांतीनाना मळेगांवकर व बालगायिका, टीव्ही स्टार सहयाद्री मळेगांवकर प्रस्तुत 'खेळ रंगला पैठणीचा - न्यू होम मिनिस्टर' हा बहारदार कार्यक्रम रंगणार आहे.

मंगळवार, दि. २ जून रोजी सायं. ६ वाजता सईशा प्रॉडक्शन्स, मुंबई निर्मित 'संगीत शिवस्वराज्यगाथा' हा सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.



**यांचा होणार पुरस्काराने सन्मान**

यंदाच्या जनकल्याण राज्यस्तरीय गौरव २०२६ पुरस्काराने अर्थ व सहकार क्षेत्रातील योगदानाबद्दल चंद्रशेखर देशपांडे, समाजप्रबोधन व आध्यात्मिक क्षेत्रातील कार्याबद्दल सन्मीता शिंदे व गणेश शिंदे, उद्योग क्षेत्रातील कार्यासाठी प्रसाद कुलकर्णी तसेच पत्रकारिता व डिजिटल मीडिया क्षेत्रातील उल्लेखनीय योगदानाबद्दल राजा माने यांचा सन्मान करण्यात येणार आहे.पुरस्काराचे स्वरूप मानाची शाल, फेटा, श्रीफळ, मानपत्र व सन्मानचिन्ह असे आहे.

बुधवार, दि. ३ जून रोजी सायं. ६ वाजता जनकल्याण राज्यस्तरीय गौरव २०२६ पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जामश्री रियाल्टी सोलापूरचे संस्थापक व व्यवस्थापकीय संचालक राजेश दमाणी हे राहणार असून इतिहास संशोधक श्रीमंत कोकाटे यांच्या हस्ते पुरस्कार वितरण होणार आहे.

सन २०१६ पासून समाजातील विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तब्बल १०५ मान्यवरांना जनकल्याण मल्टीस्टेट व फाऊंडेशनच्या वतीने गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले असल्याची माहिती राजेंद्र हजारे यांनी दिली. सर्व कार्यक्रम नागरिकांसाठी विनामूल्य खुले असून मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन जनकल्याण मल्टीस्टेटचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र हजारे व मुख्य कार्यकारी अधिकारी आशा राजेंद्र हजारे यांनी केले.

जनकल्याण मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीने १४ वर्षांच्या वाटचालीत ३०० कोटी रुपयांच्या ठेवीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे.

५० हजार ग्राहकांच्या विश्वासांवर एकूण २७ शाखांचा विस्तार केला आहे.

३१ मार्च २०२६ अखेर मल्टीस्टेट कडे एकूण २७५.०६ कोटी रुपये ठेवी आहेत. एकूण कर्ज -१९८. ४७ कोटी रुपये , वसूल भाग भांडवल- ९.४४ कोटी, एकूण गुंतवणूक- ९०.९४ कोटी, रिझर्व फंड - २.३६ कोटी, इतर फंड- ६.४२ कोटी, निव्वळ नफा -१.६८ कोटी, एकूण व्यवसाय- ४४२.४४ कोटी, एनपीए- १.०३ टक्के असल्याचे राजेंद्र हजारे यांनी सांगितले.

# चिक्केहळ्ळी गावात विहिरीत पडलेल्या बैलाला जीवदान

## बैलाचा जीव वाचवण्यासाठी सागर कल्याणशेट्टी यांनी दाखवलेली तत्परता

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):-** चिक्केहळ्ळी गावातील एका बैलाचा अपघात होऊन तो विहिरीत पडला. या घटनेची माहिती मिळताच सागर दादा कल्याणशेट्टी यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी केवळ मदत करण्याचे आवाहनच केले नाही, तर संपूर्ण बचावकार्याचे नेतृत्व स्वतः हाती घेतले. विविध यंत्रणांमध्ये समन्वय साधत, ग्रामस्थांना सोबत घेत आणि योग्य नियोजन करून त्यांनी बैलाला सुरक्षितपणे विहिरीबाहेर काढण्याचे कार्य यशस्वी केले.



आजच्या काळात अनेकजण समस्या पाहून पुढे निघून जातात, परंतु सागर दादांनी एका मुक्या प्राण्याचा जीव वाचवण्यासाठी दाखवलेली संवेदनशीलता आणि जबाबदारी ही प्रेरणादायी आहे. त्यांच्या या कृतीतून प्राणीमात्रांविषयीची करुणा, समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि संकटसमयी नेतृत्व करण्याची क्षमता दिसून येते.

सागर कल्याणशेट्टी यांचे हे कार्य केवळ एका बैलाचे प्राण वाचवण्यापुरते मर्यादित नसून, समाजात माणुसकी, दयाभाव आणि सेवाभाव जिवंत असल्याचा संदेश देणारे आहे. त्यांच्या या कार्याबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व हार्दिक कौतुक.

"नेतृत्व म्हणजे केवळ आदेश देणे नव्हे, तर संकटात स्वतः पुढे येऊन जबाबदारी स्वीकारणे होय; आणि हेच सागर दादांनी आपल्या कृतीतून सिद्ध केले."

# सोलापूर जिल्ह्यात हुमणी कीड नियंत्रणासाठी व्यापक मोहीम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** चालू वर्षात एल-निनो (एक Niño) चा महाराष्ट्रातील शेतीवर लक्षणीय परिणाम होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. पावसाचे आगमन उशिरा होणे, पावसात खंड पडणे तसेच एकूण पर्जन्यमान कमी राहणे अशा परिस्थितीची शक्यता लक्षात घेऊन कृषी विभागाने सोलापूर जिल्ह्यात हुमणी कीड नियंत्रणासाठी विशेष मोहीम हाती घेतली आहे. सोलापूर जिल्ह्यात ऊस लागवडीचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात असून, हुमणी ही कीड ऊसासह विविध पिकांच्या मुळांवर उपजीविका करून मोठ्या प्रमाणावर नुकसान करते. मान्सूनपूर्व पावसानंतर हुमणी किडीचे भुंगेरे जमिनीतून बाहेर पडतात. या भुंग्यांचा प्रारंभीच्या अवस्थेत नाश करण्यासाठी प्रकाश सापळ्यांचा वापर हा अत्यंत प्रभावी उपाय मानला जातो. त्यामुळे कृषी विभागामार्फत जिल्हाभर जनजागृती करून शेतकऱ्यांना प्रकाश सापळे उभारण्याचे आवाहन करण्यात आले होते.




या मोहिमेला शेतकऱ्यांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, एका दिवसात तब्बल २,४४९ शेतकऱ्यांनी आपल्या शेतामध्ये प्रत्यक्ष प्रकाश सापळे कार्यान्वित करून हुमणी कीड नियंत्रण मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदविला आहे. ही बाब जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये कीड व्यवस्थापनाबाबत वाढलेली जागरूकता आणि सामुदायिक सहभाग दर्शविते.

तालुकानिहाय सहभागामध्ये करमाळा तालुका प्रथम क्रमांकावर असून तेथे २८८ शेतकऱ्यांनी प्रकाश सापळे उभारले आहेत. त्याखालोखाल माढा तालुक्यात २७२, दक्षिण सोलापूर तालुक्यात २७०, सांगोला तालुक्यात २५८ आणि माळशिरस तालुक्यात २५२ शेतकऱ्यांनी या मोहिमेत सहभाग घेतला आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी दिलेल्या अवाहनाला प्रतिसाद देत श्री सुभाष भजनावळे सहाय्यक कृषि अधिकारी वटवटे (१९ मोहिमा ) श्री कैलास भोसले सहाय्यक कृषि अधिकारी कासेगाव ता पंढरपूर ( १७ मोहिमा), श्री बाबुराव बेरे सहाय्यक कृषि अधिकारी झरे ता करमाळा (१५ मोहिमा) यांनी हुमणी कीड नियंत्रणासाठी सर्वाधिक मोहीम घेतल्या.

तालुकानिहाय प्रत्यक्ष प्रकाश सापळे लावलेल्या शेतकऱ्यांची संख्या पुढीलप्रमाणे आहे :

उत्तर सोलापूर - १०१, दक्षिण सोलापूर- २७०, अक्कलकोट - १८३, मोहोळ - २४४, बार्शी - १७१, माढा - २७२, करमाळा - २८८, सांगोला - २५८, पंढरपूर - २३०, मंगळवेढा - १८० व माळशिरस - २५२. अशा प्रकारे एकूण २,४४९ शेतकऱ्यांनी प्रत्यक्ष प्रकाश सापळे उभारले आहेत.

सामूहिक प्रयत्नांमुळे हुमणी किडीचा प्रादुर्भाव कमी होऊन पिकांचे संभाव्य नुकसान टाळण्यास मदत होणार असल्याचा विश्वास कृषी विभागाने व्यक्त केला आहे. शेतकऱ्यांना हुमणी कीड नियंत्रणासाठी प्रकाश सापळ्यांचा जास्तीत जास्त वापर करण्याचे तसेच एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतींचा अवलंब करण्याचे आवाहन जिल्हयातील शेतक-यांना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी केले आहे.

# मुंबई-सोलापूर दरम्यान रविवारी विशेष रेल्वे; प्रवाशांना दिलासा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त) :-** उन्हाळी सुट्ट्यांमुळे रेल्वे गाड्यांमध्ये वाढलेल्या गर्दीच्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वे प्रशासनाने मुंबई ते सोलापूर दरम्यान विशेष एकेरी रेल्वेगाडी चालविण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष गाडी रविवार, ३१ मे रोजी धावणार असून मुंबई, पुणे, दौंड, कुर्डुवाडी आणि सोलापूर मार्गावरील प्रवाशांना याचा मोठा लाभ होणार आहे. विशेष गाडी क्रमांक ०११७५ ही ३१ मे २०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (मुंबई) येथून दुपारी २.३० वाजता सुटेल आणि त्याच दिवशी रात्री ११.४५ वाजता सोलापूर येथे पोहोचेल. प्रवाशांच्या सोयीसाठी या गाडीला दादर, ठाणे, लोणावळा, पुणे, दौंड आणि कुर्डुवाडी येथे थांबे देण्यात आले आहेत. या विशेष रेल्वेमध्ये १६ शयनयान (स्लीपर), ४ सामान्य द्वितीय श्रेणीचे डबे आणि २ गार्ड ब्रेक व्हॅन अशी व्यवस्था करण्यात आली आहे. उन्हाळी सुट्ट्या, विवाह समारंभ तसेच विविध कारणांसाठी मुंबई-सोलापूर मार्गावरील रेल्वे प्रवासाला मोठी मागणी असल्याने अतिरिक्त गाडीची मागणी प्रवाशांकडून सातत्याने केली जात होती. त्या पार्श्वभूमीवर मध्य रेल्वेने ही विशेष सेवा जाहीर केली आहे. दरम्यान, या विशेष गाडीसाठी २९ मेपासून संगणकीकृत आरक्षण सुरू करण्यात आले असून प्रवासी रेल्वे आरक्षण केंद्रे तसेच आयआरसीटीसीच्या अधिकृत संकेतस्थळावरून तिकीट आरक्षित करू शकतात. मध्य रेल्वेच्या या निर्णयामुळे प्रवाशांना गर्दीच्या काळात मोठा दिलासा मिळणार आहे.

# पोलीस प्रशासनाची जुगार अड्ड्यावर कारवाई

## 13 लाख 65 हजाराचा मुद्देमाल जप्त

**पंढरपूर (कटूसत्य वृत्त):-** पंढरपूर तालुक्यातील मौजे खर्डी येथील खताळ वस्ती येथे काही इसम रमी नावाचा पत्त्याचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली. माहितीबाबत पोलीस प्रशासनाने खात्री केली असता एका आंब्याच्या झाडाखाली मोकळ्या जागेत रात्री 10.45 वाजता लाईटच्या उजेडात काही इसम जुगार खेळत असल्याचे निर्देशनास आले. सदरठिकाणी तात्काळ कारवाई करुन 13 लाख 65 हजार 170 रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असल्याची माहिती सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

सदर जागा संतोष सुखदेव खताळ याच्या मालकीची असून ही जागा जुगार खेळण्याकरीता वापरण्यास दिल्याचे समजले.

या कारवाईत 11 हजार 170 रुपये रोख, सात मोबाईल, पत्याची पाने, दोन चारचाकी वाहन, तीन दुचाकी मोटार सायकल असा एकुण 13 लाख 65 हजार 170 रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

यामध्ये खर्डी येथील संतोष सुखदेव खताळ वय 32 वर्षे, फिरोज इलाही आतार, वय 38 वर्षे, मारूती नारायण अभिमंत वय 36 वर्षे, समाधान भारत वाकडे वय 35 वर्षे, सिताराम मारूती चव्हाण वय 38वर्षे तर अस्लम दाउद शेख, वय 32 वर्षे, रा. शेळवे, कुलजित मारूती देशमुख वय ४०, रा. कासेगाव, दिगंबर लक्ष्मण पवार वय 55 वर्षे, रा. उंबरगाव अशा आठ जणांवर कारवाई करण्यात आली.

सदर कामगिरी पोहेकॉ श्री. सर्जे, पोकॉ श्री हुलजंती, माने, भंडरवाड, सावंत, कुचेकर, साठे, लोखंडे, सुर्यवंशी, लोंढे यांनी केली असल्याची माहिती सहा. पोलीस अधिक्षक प्रशांत डगळे यांनी दिली.

# संभाजी ब्रिगेड पुन्हा एकसंघ संभाजी महाराज चौकात जल्लोष

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघाची आक्रमक युवा संघटना म्हणून ओळख असलेली संभाजी ब्रिगेड पुन्हा एकदा एकसंध झाल्याने राज्यभरातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. या ऐतिहासिक निर्णयाचे स्वागत करत सोलापूर शहर व जिल्ह्यातील संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ तसेच विविध कक्षांच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी शनिवारी (दि. ३० मे) छत्रपती संभाजी महाराज चौकात विजय जल्लोष साजरा केला. यावेळी फटाक्यांची आतषबाजी, फुलांची उधळण आणि घोषणाबाजी करत आनंदोत्सव साजरा करण्यात आला. मराठा सेवा संघाची स्थापना पुरुषोत्तम खेडेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी १ सप्टेंबर १९९० रोजी अकोला येथे केली होती. त्यानंतर १९९१ मध्ये संभाजी ब्रिगेडची स्थापना झाली. आज मराठा सेवा संघाच्या विविध ३३ कक्षांपैकी संभाजी ब्रिगेड हा एक प्रभावी आणि सक्रिय कक्ष



म्हणून कार्यरत आहे. 'शिव-फुले-शाहू-आंबेडकरी' विचारसरणीवर आधारित संविधानवादी आणि परिवर्तनवादी युवकांची एक आक्रमक फळी म्हणून संभाजी ब्रिगेडने महाराष्ट्राच्या सामाजिक जीवनात आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. सामाजिक सलोखा, जातीय ऐक्य आणि दंगली रोखण्यासाठी संघटनेने तळागाळात केलेले कार्य व्यापकपणे चर्चिले गेले आहे. त्यामुळे अठरापगड जातीतील हजारो युवकांसह मुस्लिम समाजातील तरुणही या संघटनेच्या विचारांकडे आकर्षित झाले.

राज्यात विविध सामाजिक आणि जनहिताच्या आंदोलनांमध्ये संभाजी ब्रिगेडने नेहमीच आघाडीची भूमिका बजावली. मात्र, सुमारे दहा वर्षांपूर्वी २०१६ मध्ये संघटनेत फूट पडली होती. सामाजिक कार्यावर भर देणारा एक गट आणि राजकीय भूमिका स्वीकारून निवडणुकीच्या प्रक्रियेत सहभागी होणारा दुसरा गट अशा दोन प्रवाहांत संघटना विभागली गेली होती. या विभाजनामुळे कार्यकर्त्यांचे संघटनात्मक बळ कमी झाले होते तसेच वैचारिक आणि राजकीय संभ्रमही निर्माण झाला होता.

मात्र, दहा वर्षांनंतर ही दरी मिटवत पुण्यात नुकत्याच झालेल्या कार्यक्रमात प्रमुख नेते प्रवीण गायकवाड, मनोज आखरे आणि अन्य पदाधिकाऱ्यांनी एकत्र येण्याचा निर्णय जाहीर केला. या निर्णयामुळे संभाजी ब्रिगेडची ताकद पुन्हा एकवटली असून राज्यभरातून त्याचे स्वागत होत आहे.

सोलापुरातील कार्यकर्त्यांनीही या एकीकरणाचे स्वागत करत संघटनेच्या आगामी सामाजिक, शैक्षणिक आणि परिवर्तनवादी चळवळींना नवसंजीवनी मिळेल, असा विश्वास व्यक्त केला. संघटनेची एकजूट ही समाजपरिवर्तनाच्या लढ्याला अधिक बळ देणारी ठरेल, अशी भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

यावेळी मराठा सेवा संघाचे शहराध्यक्ष सूर्यकांत पाटील उपाध्यक्ष सदाशिव पवार, संभाजी ब्रिगेडचे सोमनाथ राऊत, प्रकाश ननवरे, श्याम कदम, सचिन जगताप, गिरीश जगदाळे, किरण घाडगे, प्रदीप कणसे, संभाजी भोसले, बाळासाहेब बागल, प्रीती कदम अभिंजली जाधव, यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे पदाधिकारी जिजाऊ ब्रगडच्या महिला सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अहिल्याराणी लोक कल्याणकारी प्रजाहितदक्ष महाराणी होत्या - राम गायकवाड

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** मराठा सेवा संघ संचलित छत्रपती शिवाजी मुस्लिम ब्रिगेड सोलापूर यांच्या वतीने अहिल्याराणींच्या पुतळ्यास जिल्हाध्यक्ष शफीक रचभरे, राजन जाधव मा. उपमहापौर पद्माकर काळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.



अहिल्याराणीनी होळकर संस्थानांचा कारभार हाती आल्यावर आपल्या संस्थानात जागोजागी धर्मशाळा, विहिरी उभारून वाटसरुची सोय केल्या. मानवा बरोबर पशुपक्षांसाठी देखील औषधोपचार केंद्र उभारल्या वन औषध लागवडीस प्रोत्साहन दिले. निरपेक्ष न्याय निवाडयासाठी प्रसिध्द होत्या. एक प्रजाहितदक्ष राज्यकर्त्या म्हणून आजही अहिल्याराणींच नाव निघत अस मत मराठा सेवा संघाचे राम गायकवाड यांनी व्यक्त केले. या अभिवादन कार्यक्रमास नगरसेविका अकिला भागानगरी माजी नगरसेवक हारुण शेख, कादर भागनगरी, बशीर सय्यद, राजू हुंडेकरी, रियाज पैलवान, रिझवान दंडोती, कय्युम मोहळकर, रुस्तुम शेख रिजवान शेख सर, काशीब बेलीफ, मोहसीन नदाफ, तन्वीर गुलजार, गफूर शेख, हारिस शेख तन्वीर शब्बीर फुलमामडी, हुजेर बागवान, अली बागवान आदी उपस्थित होते.

# अकलूज येथे तीन महिन्यांच्या स्वस्त धान्य वाटपात महाघोटाळा?

## 'हॉटेल व्यवसायिक, भुसार मालाचे व्यापारी यांच्याशी जोडली गेली नाळ'

**अकलूज (विलास गायकवाड):-** अकलूज मधील दोन,तीन स्वस्त धान्य दुकाने सोडली तर सर्रास शासकीय धान्याचा काळाबाजार करण्याचे महापाप,अकलूज मधील स्वस्त धान्य दुकान चालकांनी केले असून, मे महिन्यात सलग तीन महिन्यांच्या धान्य वाटपात महाघोटाळा झाला असल्याची माहिती समोर येत असल्यामुळे, संबंधित विभागाने पारदर्शकपणे चौकशी करावी असे बोलले जात आहे.

अकलूज मध्ये हॉटेल संख्या, खाणावळ संख्या, मेस आणि मसाला राईस नाष्टा, दालचा राईस नाष्टा विक्री याची संख्या खूप जास्त आहे. तसेच भुसार मालाचे व्यापारी, काही किराणा दुकाने अशा ठिकाणी शासकीय स्वस्त धान्यांची विक्री होत असल्याचे सूत्रांकडून समजले आहे.



असे व्यावसायिक लोक आणि स्वस्त धान्य दुकान चालक यांचे, ग्राहक व विक्रेता म्हणून घनिष्ठ संबंध असल्याची चर्चा होऊ लागली आहे. यामुळे सदरची बाब अत्यंत गंभीर असून, माळशिरस पुरवठा विभागाची कृपादृष्टी राशन चालक यांच्यावर आहे? असे गंभीर आरोप संबंधित विभागावर होताना दिसत आहे.

अकलूज नगरपरिषद हद्दीत, मोठ्या प्रमाणात शासकीय स्वस्त धान्याचा काळा बाजार होतो आहे, हे अकलूजच्या पंचक्रोशीला माहीत आहे. केवळ काही स्वस्त धान्य दुकान चालकांची गुंडवृत्ती पार्श्वभूमी व राजकीय कृपाशीर्वाद असल्यामुळे, स्वस्त धान्य दुकानदार यांच्या विरुद्ध सामान्य नागरिक तक्रार करण्यास पुढे येऊ शकत नाही, अशी खंत काही ग्राहकांमधून व्यक्त होताना दिसत आहे. आम्ही जर स्वस्त धान्य दुकानदार यांच्या विरुद्ध तक्रार केली आणि ते लोक आमचेशी बरे वाईट वागले तर अशी भीतीही काही ग्राहकांनी व्यक्त केली आहे.

समस्त मानव जातीवर काही वर्षापूर्वी कोरोनाने केलेले आक्रमण आणि धडकी भरवणारे लॉकडाऊन, हे अखंड आयुष्य कोणीही विसरू शकणार नाही. कारण उपासमारीची खरी किंमत, ज्यांची हातावरची पोटे होते त्यांना माहित आहे आणि यापैकी कित्येक गोरगरीब जनतेचा उदरनिर्वाह स्वस्त धान्य दुकानातील धान्यावर होत आहे.याची जाणीव स्वस्त धान्य दुकान चालक यांना नाही.

यामुळेच आता अकलूज मधील स्वस्त धान्य दुकानदारांची सखोल चौकशी करण्यात यावी अशी मागणी स्वस्त धान्य दुकान ग्राहक करीत आहेत.

अकलूज शहरामध्ये एक दोन रेशन दुकानदार वगळता, कोणताच दुकानदार शिधा धारकांना वेळेवर धान्य देत नाहीत आणि जरी दिलेच तर कपात करून दिले जाते. सोलापूर जिल्हा पुरवठा अधिकारी व तालुका पुरवठा विभाग योग्य अशी कारवाई करत नसल्याने रेशन धारकांची मुजोरी वाढली आहे. राज्याचे नागरी पुरवठा मंत्री व सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री यांनी रेशन दुकानदारांच्या मनमानी आणि भ्रष्ट कारभारावर लगाम घालण्याची गरज आहे.

# अहिल्यादेवी होळकर जयंती निमित्त ३०१ वृक्ष लावण्याचा आणि संवर्धनाचा संकल्प

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जीर्णोद्धारिनी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती सोलापूर शहरात अत्यंत उत्साहात आणि जल्लोषात साजरी करण्यात आली. जीर्णोद्धारिनी प्रतिष्ठान च्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात अहिल्यादेवींच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आणि अभिवादन करून झाली. जयंतीच्या निमित्ताने नागरिकांना व कार्यकर्त्यांना लाडू प्रसादाचे वाटप करून सर्वांचे तोंड गोड करण्यात आले.

**३०१ वृक्षांचे रोपण आणि संवर्धनाचा अनोखा संकल्प**

प्रतिष्ठानचे हे प्रथम वर्ष असून, जयंतीचे औचित्य साधून एक सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रम हाती घेण्यात आला आहे. सोलापूर शहरात तसेच प्रतिष्ठानच्या पदाधिकाऱ्यांच्या, नातेवाईकांच्या आणि मित्रपरिवाराच्या घरासमोर



एकूण ३०१ वृक्ष लावण्यात येणार आहेत. केवळ वृक्षारोपण करून न थांबता, या लावलेल्या झाडांचे वर्षभर जबाबदारीने संवर्धन करून दाखवणार, असा ठाम मानस प्रतिष्ठानच्या वतीने व्यक्त करण्यात आला.

"संस्कार, संशोधन आणि समाजसेवा" हे ब्रीदवाक्य घेऊन स्थापन झालेले जीर्णोद्धारिणी प्रतिष्ठान हे कार्य वर्षभर अखंडपणे चालू ठेवणार आहे, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या सोहळ्याला सोलापूर शहरातील राजकीय, सामाजिक आणि विविध संघटनांचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने:

अमलबापू शिंदे (शिवसेना जिल्हाध्यक्ष तथा नगरसेवक)

सतीश वावरे (संस्थापक अध्यक्ष, जीर्णोद्धारिनी प्रतिष्ठान)

शिरीष जगदाळे (मार्गदर्शक तथा संभाजी ब्रिगेड शहराध्यक्ष)

लखन गावडे (मध्यवर्ती महामंडळ)

बिराप्पा बंडगर (मध्यवर्ती महामंडळ) माने मॅडम (महामंडळ अध्यक्ष) माशाळकर मॅडम (कार्याध्यक्ष) यांच्यासह संभाजी ब्रिगेडचे प्रकाश ननवरे, दिलीप भोसले, दिलीप निंबाळकर, लिंगराज जाधव, खामितकर साहेब, विक्रांत वनकर, ऋषिकेश कोकरे, सिद्धराम सावळे, शेखर कंटीकर, शेखर भोसले, प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मल्हारी भक्त बहुसंख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी जीर्णोद्धारिणी प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी विशेष परिश्रम घेतले. सर्व उपस्थितांनी प्रतिष्ठानच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे विशेष कौतुक केले.